माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३८५९ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सचिन उद्धव शिंदे | प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी |

**( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २५.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती देण्यास नकार दिला " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २१.०३.२०२४ | दि. ०५.०३.२०२४ रोजी करण्यात आलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची सत्य प्रती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. "

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, " अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. १६.०४.२०२४ रोजीच्या पत्राने माहिती दिली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी

सुनावणी घेऊन दि. २०.०५.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध अभिलेख दिले असल्याने अपील अमान्य करण्यात येत आहे, असा निर्णय पारित केला आहे. "

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. १६.०४.२०२४ रोजीच्या पत्राने तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेवून अपील अमान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

जावक क्र. ३८५९ / २०२४ / पुणे 10850/2025 दिनांक - 11/12/2025